# शिनची तीनचाकी सायकल

दर ऑगस्ट महिन्यात मला त्या घटनेची आठवण हैराण करते.माझ्या डोळयांसमोर माझा मुलगा शिन येतो.वाढदिवसाची भेट म्हणून हव्या असलेल्या लाल रंगाच्या तीनचाकी सायकलीवर बसलेला शिन.पण काही क्षणातच त्या सुंदर चित्राला धुराचे आणि राखेचे ढग झाकून टाकतात.आमच्या सगळयांच्या स्वप्नांवर पाणी पाडणारा ऑगस्ट महिन्यातील तो दिवस आठवला की माझ्या डोळयांसमोर अंधारी येते.

जवळ जवळ पन्नास वर्षे झाली असतील त्या घटनेला.त्या वेळी आम्ही जपान मधल्या हिरोशिमा या ठिकाणी राहत होतो.शिन तेव्हा फक्त तीन वर्षांचा होता.शांत वाहणाऱ्या नदीच्या काठावर आमचे छोटेसे घर होते.आम्हाला एकूण तीन आपत्य.शिन, मिचिको आणि योको.एक मुलगा आणि दोन मुली.पण शिनची सर्वात जवळची मैत्रिण होती शेजरी राहणारी किमि.शिन आणि किमि रोज "घर घर" खेळत आणि पुस्तकांतील रंगीबेरंगी चित्रं बघत.त्यात शिनचे सर्वात आवडते चित्र म्हणजे लाल रंगाची तीन चाकी सायकल.शिनला काहीही करून ती सायकल हवी होती.पण ती त्याला घेवून देणे आम्हाला शक्य नाही हे ही त्याला कळत होते.

त्या काळी जपानमधे तीनचाकी सायकलीच उरल्या नव्हत्या.**1941** साली जपानने दुसऱ्या महायुद्धात उडी घेतली.अमेरिका आणि इतर आणखी काही देशांवर हल्ले केले.त्यानंतरीची चार वर्षे युद्धात गेली.त्या काळात लोखंडाच्या असतील नसतील त्या सगळया वस्तू – सायकली, मंदिरातल्या घंटा, अगदी जेवणाची भांडीही वितळवून रणगाडे आणि तोफा बनवल्या जात होत्या.त्यात मुलांची खेळणी देखील नाहीशी झाली.

पण शिनला ती सायकल एवढी हवी होती की एक दिवस तो हट्ट करून बसला आणि काही खाण्याचे नावच घेईना.तो माझ्या खूपच मागे लागला, "बाबा, तुम्ही मला तीनचाकी सायकल घेणार ना हा? घ्या ना बाबा, घ्या ना हो..."

शिनची आई हलकेच त्याच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाली, "शिन, तुला थोडं धीर धरायला शिकलं पाहीजे.सध्यातरी हव्या असलेल्या सगळयाच गोष्टी आपल्याला मिळतीलच अशी परीस्थिती नाहीये".
हे ऐकून शिन अगदीच हिरमुसला.पण आईचे म्हणणे त्याला पटत देखील होते.

मग एके दिवशी जपानी नौदलात असणारा शिनचा काका आम्हाला भेटायला आला.शिनला हाक मारत तो म्हणाल, "शिनबाबू, लवकर या.हे बघा काय आणलय आम्ही तुमच्यासाठी".
"काय आणलस रे काका"? काकाच्या हातातील भल्यामोठया खोक्याकडे डोळे विस्फारून बघत शिनने विचारले.

''ओळख पाहू...'' काका म्हणाला.''तुला खूप खूप खूप हवी असलेली गम्मत आहे''.
असे म्हणत त्याने ते खोके आपल्या पाठीमागे लपवले.शिन अतिशय उत्सुकतेने काकाच्या भोवती उडया मारत खोक्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करू लागला.पण काकाने देखील ती भेट लपवून ठेवली पाठीमागे.

येवढयात शिनला त्या खोक्यातून लाल रंगाचे हॅंडल बाहेर डोकावताना दिसले.

''हुररे......कळले मला काय आहे ते.सायकल.........''
त्याचा त्याच्या डोळयांवर विश्वासच बसेना.खोके उघडताना शिनचे डोळे भरून आले.
''थॅंक यू काका.थॅंक यू व्हेरी मच.कुठे मिळाली रे''?
''अरे कपाटात मागे दडून बसली होती.या वेळेला तुझ्या वाढदिवसाच्या आधीच मी बोटीवर जाणार आहे ना.म्हणून म्हटले अत्ताच दयावी तुला तुझ्या वाढदिवसाची भेट''.
शिनने त्या सायकलीवर पटकन उडी टाकली आणि ऐटीत म्हणाला.
''बाबा बघा ना...काकाने मला सायकल आणली...''
6 ऑगस्टची सुंदर सकाळ.पानांची सळसळ आणि मधूनच होणारा पक्षांचा किलबिलाट.अचानक ती शांतता भंगत अमेरीकी विमानांच्या बॉब हल्ल्यांची सूचना देणारे सयरन वाजू लागले.सायरनचा आवाज थांबताच शिन आणि किमि हसत.खिदळत बाहेर परसबागेत गेले आणि शिनच्या सायकलीवर खेळू लागले.
सायकलीवर बसलेल्या शिन आणि किमिला बघून जवळच रस्तादुरूस्तीचे काम करणारे सैनिक देखील हसले.शिन आणि किमिचे डोळे एका वेगळयाच आनंदाने चमकत होते.मी देखील हसत हसत ऑफिसची तयारी करावी म्हणून मागे फिरलो आणि घरात शिरलो.बरोबर त्याच क्षणी जे ध्यानीमनी नव्हते ते घडले.
कानांचे पडदे फाडणारा प्रचंड स्फोटाचा आवाज झाला आणि माझे डोळे प्रखर प्रकाशाने दिपून गेले.जगाचा अंत झाला जणू.आणि मग माझ्या डोळयांसमोर अंधार पसरला.
शुद्ध परत आली तेव्हा सभोवती अंधाराचे सामराज्य होते.मी जागचा हलू शकत नव्हतो.अडकून पडलो होतो.पण कुठे?
माझ्या डोक्यावरील एका छोटयाशा फटीतून येणारा प्रकाश मला दिसला.अंगावर पडलेल्या तुळयांचा अंदाज घेत मी चाचपडू लागलो.माझ्या हाताला काहीतरी गुळगुळीत.सपाट गोष्ट लागली.ते आमच्या घराचे छत होते.सारे घरच माझ्या अंगावर कोसळले होते.
मी त्या प्रकाशाच्या दिशेने सरकत सरकत कसाबसा छतावर पोहोचलो.धूराचे आणि उष्ण हवेचे हबकारे माझ्या चेहऱ्यावर बसत होते.माझा माझ्या डोळयांवर विश्वास बसेना.काहीच उरले नव्हते.शेजारच्या किमिचे घर.माणसे सगळे सगळे नाहीसे झाले होते.हिरोशिमा नाहीसे झाले होते.
मी इकडेकिडे पाहत ओरडलो.''कुणी आहे का''?
''आहो'' शिनची आई.''आहो मी इथे आहे...मला बाहेर काढा...''

फळकुटांच्या त्या ढिगाऱ्यातून धडपडत, कशीबशी वाट काढत मी शिनच्या आईपाशी पोहोचलो.ती तेथे त्या ढिगाऱ्यात काही उपसत बसली होती.एका मोठया तुळईखाली लहानगा शिन दबला गेला होता.

मी ती तुळई उचलून धरली आणि शिनच्या आईने शिनला वर ओढून काढले.त्याचा चेहरा रक्तबंबाळ होवून सुजला होता.त्याच्या अंगात बोलायचा देखील त्राण नव्हता.पण अजून देखील तो एका हातात सायकलची लाल मूठ घट्ट पकडून होता.किमि मात्र त्या ठिगाऱ्यात दिसेनाशी झाली होती.

आणि मग मला त्या छताखाली अडकून बसलेले दोन फ्रॉक दिसले.मिचिको आणि योकोचे होते ते.त्या दोघींच्या दिशेने आगीचा एक लोळ येत होता."मिचिको, योको, हा मी आलोच......"

त्या दोघींच्या अंगावरच्या तुळया मी सर्व ताकदीनिशी बाजूला करण्याचा प्रयत्न केला.पण......तो आगीचा लोळ आता इतका जवळ आला होता की मला त्याची चांगलीच धग जाणवत होती.आणि अचानक त्यांच्या अंगावरील तुळयांनी पेट घेतला.

"मिचिको, योको". माझ्या पोटच्या पोरींना वाचवण्यास मी असमर्थ होतो......

पण शिन कदाचित अजूनही वाचला असता.आम्ही त्याला आगीपासून दूर, नदीकडे घेऊन गेलो.

बॉबस्फोटातून वाचलेल्या लोकांनी नदीचा काठ भरून गेला होता.विदारक दृष्य होते ते.सगळयांची शरीरे भाजली होती आणि पाण्यासाठी आक्रोश चालू होता.

"पाणी, पाणी" आपल्या क्षीण आवाजात शिनने पाणी मागीतले.मला त्याला पाणी द्यायचे होते पण नदीचे पाणी पिऊन तडफडणारे लोक पाहून हिम्मत होईना.

"बाबा......" शिनचा आवाज अगदी ऐकू येईनासा झाला होता."माझी......माझी सायकल बाबा......" अजूनही सायकलची मूठ हातात धरून असलेल्या शिनचा चिमूकला हात मी हातात घेतला.

तो हात हलकेच दाबत मी त्याला म्हणालो, "शिन बेटा, तुझ्या हातात अजूनही सायकलची मूठ आहे बेटा..." शिनचा सुजलेला चेहरा उजळला आणि तो समाधानाने हसला.पण त्या रात्री शिनने या जगाचा निरोप घेतला.त्यानंतर बरोबर दहा दिवसांनी शिनचा चौथा वाढदिवस होता.

दुसऱ्या दिवशी आम्ही आमच्या घरी परतलो.बेचीराख झालेल्या त्या अवशेशात मला मिचिको आणि योकोच्या अस्थी सापडल्या.मला रडू अवरेना."मला माफ करा माझ्या लाडक्यांनो.मी वाचवू नाही शकलो तुम्हाला..."

त्यांच्या अस्थी पुरल्यानंतरही मी बराच वेळ रडत होतो.अगदी कालपर्यंत आनंदाने बागडणाऱ्या त्या दोघी माझ्या डोळयांसमोर येत राहील्या.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी आमच्या परसबागेत शिनला पुरण्यासाठी खडडा खणला.तेवढयात किमिची आई किमिचे मृत शरीर घेऊन आली आणि म्हणाली,

"दोघांची खूप चांगली गट्टी होती.दोघांना एकत्रच......"

शिन आणि किमिला पुरले त्या जागीच ढिगाऱ्यात नंतर सापडलेली शिनची सायकल देखील आम्ही पुरली.त्यानंतर रोज संध्याकाळी नदीकाठी जावून आम्ही आमच्या छबकडयांना हाक मारायचो, "शिन, मिचिको, योको......"

हिरोशिमावरील अणुहल्ल्याला चाळीस वर्षे झाली.त्यावेळी पूर्ण पुसले गेलेले शहर परत वसले.काहीच उगवू शकणार नाही असे वाटलेल्या मातीतून झाडे झुडपे. फळे फुले बहरली.बागांमधून पुन्हा एकदा मुले खेळू बागडू लागली.

माझ्या मुलांचे हसरे चेहरे आठवले म्हणजे त्या आठवणींनी माझ्या छातीत कळ उठे.

गेली कित्येक वर्षे आमची मुले शांतपणे परसबागेत निजून होती.ती अशी आमच्या जवळच आहेत या भावनेने आम्हा नवरा बायकोला समाधान पण वाटे.तरी देखील वैकुंठात नीट प्रकारे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करावेत असे देखील वाटे.मग एक दिवस आम्ही त्यांची पार्थीवे परसबागेतून काढून वैकुंठात नेण्याचा निर्णय घेतला.किमिची आई देखील आमच्या मदतीला आली.

''अगं हे बघ. शिनची सायकल.ती इथे आहे ते विसरूनच गेलो होतो की...'' बोलता बोलता मला रडू फुटले.मला ते दृष्य बघवेना.मी तेथून बाजूला झालो.

''अहो ते पाहा काहीतरी पांढरे दिसते आहे......'' शिनची आई म्हणाली.

हातात हात धरलेल्या किमि आणि शिनच्या अस्थी अजून तशाच्या तशा होत्या.

युद्ध हे नेहमीच निष्ठूर असते.युद्ध सुरू करणारा भले कुणीही असो...त्यात होरपळतात मात्र निष्पाप लोक।शिन सारखी निरागस मुले.

भरल्या डोळयांनी मी हळूवारपणे शिनची सायकल उचलली.

''लहान मुलांना हे भोग कधीच भोगावे लागू नयेत.शिनची सायकाल पाहून. लहान मुलांना निर्भयपणे हसता बागडता येण्यासाठी या जगात शांतता नांदली पाहीजे या गोष्टीची जाणीव खूप लोकांना होईल''मी म्हणालो.

दुसऱ्या दिवशी शिनची सायकल मी हिरोशिमातील शांतता संग्रहालयात घेऊन गेलो.शिनची गोष्ट आता ''जगभरातील मुलांसाठी शांतता कायम ठेवा'' असा संदेश देते.........